# ‘कॉक्सिट’ मध्ये ‘टेक महिंद्रा’तर्फे झालेल्या मुलाखतीत विद्यार्थ्यांची निवड

लातूर : दि. १४ संगणकीय प्रणालीच्या (सॉफ्टवेअर) क्षेत्रात नावाजलेल्या टेक महिंद्रा या कंपनीच्या वतीने सोमवारी (ता. १४) येथील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालय (कॉक्सिट) कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या, त्यामध्ये विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

पुणे येथील नामांकित सॉफ्टवेअर कंपनीद्वारे आयोजित कॅम्पस मुलाखतीमध्ये संगणक प्रणाली अभियंता या पदासाठी कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या यामध्ये लातूर, परभणी, नांदेड, उस्मानाबाद तसेच इतर जिल्ह्यातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सदर मुलाखतीमध्ये नारायण जाधव, प्रियंका बेले, सुकन्या पाटील, भाग्यश्री मिरजकर, विभा भंडाले , पुजा चव्हाण, इत्यादी या विद्यार्थ्यांची संगणक प्रणाली अभियंता या पदासाठी निवड करण्यात आली. टेक महिंद्रा तर्फे घेण्यात आलेल्या या कॅम्पस मुलाखतीमध्ये यशस्वी विद्यार्थ्याचे महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील यांनी अभिनंदन केले. यापूर्वी महाविद्यालयात आय-गेट पटनी, विप्रो, टी.सी.एस., वृत्ती, सिन्टेल, एन्टोरेज आदी आय. टी कंपन्यांच्या वतीने कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या, यातून शेकडो विद्यार्थ्यांना चांगल्या पगारावरील नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.

सदर मुलाखतीच्या डॉ. एम. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन प्रसंगी टेक-महिंद्राचे सिनिअर एच.आर. मॅनेजर श्री. रवि सोनी म्हणाले की, सन २०१४-१५ हे वर्ष फक्त संगणक पदवीधर (बी.सी.ए.,बी.एस्सी. सी.एस., सी.एम., एस.ई., आय.टी., एन.टी.) असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाचे तसेच अनुकुल आहे. एमएनसी २०१४-१५ साठी वरील पदवीधरांच्या नेमणुकीसंबंधी मोठ्या प्रमाणात विचार करत आहेत.

या मुलाखती यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उपप्राचार्य डॉ. बी.एल. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एन.एस. झुल्पे, प्रा. एस. आर. माने, प्रा. एस. जी. त्रिमुखे, प्रा. डी. आर. सोमवंशी, प्रा. एल.एम.पाटील,प्रा. के. एस. जेवे, प्रा. एस. एन. पाटील, आदी प्राध्यापकांनी परीश्रम घेतले.

प्राचार्य

डॉ. एम. आर. पाटील